# ।। अरबळ को अंग ।।

## मारवाडी + मराठी

✻

महत्वाची सुचना:- रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## ।। अथ अरबळ को अंग लिखंते ।।

।। रेखता ।।

च्यार जुग जाय जब चोकडी अेक हे ।। इन्द्र की आव मे केहेत भाया ।।
पाँच पचीस पचास मे आठनी ।। निगम मे अर्थ सो संत गाया ।।
च्यार पर तीन अर तीन पर च्याररे ।। इन्द्र अे पड़त दिन अेक जाई ।।
अें बड़ा दिन का मास कर बरसरे ।। दुज की आव सो बरस ताई ।।
दुज की आवतां इसका तीन दिन ।। सगत सिणगार में ईस जाई ।।
सगत सिणगार बोहो सज केती गई ।। ब्रम्ह को टुक नहि ध्यान क्वायो ।
दास सुखराम कछु बार नहि पाररे ।। सब ही संत मिल नाम गायो ।।१।।

आर्बल(आयु/वय)एक चौकडी म्हणजे सतरा लाख,अठ्ठावीस हजार वर्ष (१७,२८,०००) सतयुगाचे,बारा लाख,शहान्नव हजार(१२,९६,०००)त्रेतायुगाचे,द्वापार युगाचे आठ लाख चौसष्ठ हजार वर्ष(८,६४,०००)आणि कलीयुगाची आयु चार लाख,बत्तीस हजार वर्षाची होते(४,३२,०००)अशी एक चौकडी,त्रेचाळीस लाख,वीस हजाराची होते(४३,२०,०००) या अशा वर्षाला बहात्तर चौकडीने गुणल्यावर,इंद्राची आयु(वय)होते,म्हणजे एकतीस कोटी ,दहा लाख चाळीस हजार वर्ष इंद्राची आयु(वय)होते.(३१,१०,४०,०००)असे अठ्ठावीस इंद्र जातात तेव्हा ब्रह्माचा एक दिवस आणि एक रात्र होते,ब्रह्माचा एक दिवसाचा वर्ष आठ अब्ज, सत्तर कोटी, एक्कावन लाख,वीस हजार वर्ष होते,(८,७०,९१,२०,०००) अशा महिन्याच्या दिवसाला तीसने गुणले तर ब्रह्माचे एक महिन्याचे वर्ष दोन निखर्व,सहा खर्व, एक अब्ज,सत्तावीस कोटी छत्तीस लाख वर्ष,(२,०६,१,२७,३६,००,०००) एका वर्षाच्या बारा महिन्यांने गुणले तर,ब्रह्माचे वय एक वर्षाचे वर्ष,तीन महापद्म,एक निखर्व,तीन खर्व,पाच अब्ज,अठ्ठावीस कोटी,बत्तीस लाख,वर्ष ब्रम्हाचे वय असते,असे शंभर वर्ष ब्रह्माचे आयुष्याचे वर्ष,तीन जलदी,एक शंखु,तीन महापद्म,पांच निखर्व,दोन खर्व,आठ अब्ज,बत्तीस कोटी वर्ष.महादेवाचे एक वर्षाचे वर्ष,तीन मध्य,सात अंत्य,सहा जलदी,दोन शंकू,तीन महापद्म,तीन निखर्व,नऊ खर्व,आठ अब्ज,चाळीस कोटी,याला शंभरने गुणले, तर महादेवाची आयु (वय)किंवा शक्तीस श्रृंगार करण्यास जितके वर्ष लागतात,सदोतीस परार्ध,सहा मध्य,दोन अंत्य,तीन जलदी,तीन शंकू,नऊ महापद्म,आठ निखर्व,चार खर्व वर्ष.अशा शक्ती कित्येक चालल्या जातात,तेव्हा सतस्वरुप ब्रह्मचे ध्यान टुक(थोडेसेही)होत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगितले की,सर्व संत जे राम नामाचे स्मरण करुन,सतस्वरुप रामात मिळून गेले,त्या सतस्वरुप रामाचा काही वारपार नाही.।।१।।

।। इति अरबळ को अंग संपूरण ।।